इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

मुंबई उच्च न्यायालय
नागपूर खंडपीठ, नागपूर

पहिले अपील क्र. २५०/२०२२

अपीलकर्ते : प्रशांत बाबाराव भोंगळे - मयत झाल्यानंतर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींमार्फत:
(मूळ याचिकाकर्ते)
(ऑन. आर.ए.)

1. साधना प्रशांत भोंगळे,
   वय - सुमारे ४८ वर्षे; धंदा- गृहिणी
2. कु. शुभांगी प्रशांत भोंगळे, वय २७, रा. धंदा- विद्यार्थी
3. सुरभी प्रशांत भोंगळे,
   वय - सुमारे २४ वर्षे; धंदा- विद्यार्थी
4. सौ. शांताबाई बाबाराव भोंगळे,
   वय - सुमारे ७८ वर्षे; धंदा - गृहिणी, सर्व रा. यमुना भवन, गजानन मंदिर रोड, वडगाव, तालुका व जिल्हा- चंद्रपूर.

.. **विरुद्ध..**

उत्तरवादी :
(मूळ उत्तरवादी)
(ऑन आर.ए.)

1. मोहन आन्याजी फरफाद,
   वय- सुमारे ५३ वर्षे; धंदा- नोकरी, सी/ओ श्री घुमे, गणपती मंदिराजवळ, जतपुरा प्रभाग क्र.१, रामनगर, चंद्रपूर, तहसील व जिल्हा – चंद्रपूर

2. कुणाल विजय काकडे,
   वय – सुमारे २१ वर्षे; धंदा- शिक्षण, राहणार- गजानन मंदिराच्या मागे, वडगाव रोड, चंद्रपूर, तालुका व जिल्हा- चंद्रपूर

अपीलकर्त्यांचे वकील, श्री. एम. पी. खजांची
उत्तरवादी क्रमांक १ चे वकील श्री. टी. एस. देशपांडे

न्यायमंच : न्यायमूर्ती: एम. डब्ल्यू. चांदवानी.
राखीव दिनांक : ९ ऑक्टोबर २०२४
घोषित दिनांक :२ जानेवारी २०२५.

न्यायनिर्णय :

1. ऐकले.

2. मोटर अपघात दावा न्यायाधिकरण चंद्रपूर यांनी दिनांक २६.०४.२०२१ रोजी दिलेल्या विवादीत अवॉर्ड च्या योग्यतेला आव्हान देत ही याचिका दाखल करण्यात आली आहे, ज्यामध्ये न्यायाधिकरणाने प्रशांत बाबुराव भोंगळे यांच्यावर अवलंबून असलेल्या मूळ याचिकाकर्ता यांच्यासाठी नुकसान भरपाई म्हणून रुपये ३२,६८,४२७ देण्याचे आदेश दिले. वाहन अपघातामध्ये प्रशांत यांचा मृत्यू दिनांक १२.०१.२०१९ रोजी झाला, परंतु प्रत्यक्ष अपघात हा दिनांक २०.०२.२०१५ रोजी घडला होता.

3. सध्याच्या अपिलामध्ये उत्पन्न झालेली मुख्य तथ्य थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील:

२०.०२.२०१५ रोजी मयत प्रशांत भोंगळे हे एमएच-३४-एआर-५५४४ क्रमांकाच्या होंडा एक्टिवा या मोटारसायकलवरून चंद्रपूरच्या दिशेने जात होते. परंतु, जेव्हा ते बापट नगर चौक, चंद्रपूर जवळ पोहोचले तेव्हा उत्तरवादी क्रमांक २ चालवत असलेली एमएच-३४-एजी-०७०८ क्रमांकाची मोटारसायकल हिरो पॅशन प्रो (यापुढे " नुकसान पोहोचवणारी गाडी" म्हणून नमूद) ही भरधाव वेगाने आली आणि त्याने प्रशांत यांच्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिल्याने ते खाली पडले, त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ते जागेवरच बेशुद्ध झाले. तत्काळ, त्यांना चंद्रपूर येथील शासकीय रुग्णालयात व नंतर नागपूर येथील न्यूरॉन रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर त्यांना चंद्रपूर येथील ख्राईस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आणि नंतर त्यांना पुन्हा नागपूर येथील न्यूरॉन रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र दुर्दैवाने ते बेशुद्ध अवस्थेत राहिले आणि त्यांना शुद्ध आली नाही. सुरुवातीला मयत प्रशांतची पत्नी अपीलकर्ता क्रमांक १ हिने मयताचे नेक्स्ट फ्रेंड म्हणून दुखापत याचिका दाखल केली. याचिका प्रलंबित असताना मयत प्रशांत यांचा मृत्यू १२.०१.२०१९ रोजी झाला आणि सध्याच्या अपीलकर्त्यांना प्रशांतचे कायदेशीर प्रतिनिधी म्हणून बदलण्यात आले. मृत्यू झाल्यानंतर अपीलकर्त्यांनी दुखापत याचिका बदलून तिचे रूपांतर रुपये ९४,१०,०००/- च्या मृत्यू याचिकेमध्ये केले.

4. उत्तरवादी क्रमांक १ हा नुकसान पोहोचवणाऱ्या वाहनाचा मालक आहे. अपघाताच्या वेळी उत्तरवादी क्रमांक २ हा नुकसान पोहोचवणारे वाहन चालवत होता. उत्तरवादी क्रमांक ३ हा मोटरसायकल होंडा एक्टिवा गाडीचा मालक असून उत्तरवादी क्रमांक ४ ही या मोटारसायकलची विमाकर्ता आहे. उत्तरवादी क्रमांक १ व २ यांनी लेखी जबाब दाखल करून दाव्याला विरोध केला. २२.०२.२०१५ रोजी झालेल्या अपघातात प्रशांतच्या डोक्याला मार लागल्याने त्याचा मृत्यू १२.०१.२०१९ रोजी झाला, असे मत न्यायाधिकरणाने व्यक्त केले. न्यायाधिकरणाने उत्तरवादी क्रमांक १ व २ यांना ३२,६८,४२७/- रुपयांची रक्कम संयुक्तपणे व स्वतंत्रपणे भरण्याचे आदेश देत याचिका अंशत: मान्य केली. न्यायाधीकरणाने दिलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेवर नाराज झालेल्या याचिकाकर्त्यांनी नुकसानभरपाई वाढीसाठी सध्याचे अपील दाखल केले आहे.

5. अपीलकर्त्यांनी नुकसानभरपाई वाढीसाठी अपिलात उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर मी कार्यवाही करण्यापूर्वी, उत्तरवादी क्रमांक १ - म्हणजेच नुकसान पोहोचवणाऱ्या वाहनाच्या नोंदणीकृत मालकाने अपीलाच्या ग्राह्यतेबद्दल उपस्थित केलेल्या आक्षेपांचा विचार करणे योग्य ठरेल. येथे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, न्यायाधिकरणाने आक्षेपार्ह अवॉर्ड दिल्यानंतर अपीलकर्त्यांनी आक्षेपार्ह अवॉर्ड च्या अंमलबजावणीसाठी दावा याचिकेचे व्याज आणि खर्च मिळून रु.५०,७४,८२१/- रक्कमेचे प्रकरण न्यायाधीकरणासमोर दाखल केले. अंमलबजावणी प्रक्रिया प्रलंबित असताना, हे प्रकरण

लोकअदालतीकडे पाठविण्यात आले, जिथे अपीलकर्ते आणि उत्तरवादी क्रमांक २ - नुकसान पोहोचवणाऱ्या वाहनाचा चालक यांनी रु.४०,००,०००/- (फक्त चाळीस लाख) मध्ये तडजोड केली. तडजोडीत, असे ठरले की, जरी उच्च न्यायालयाने अपीलामध्ये नुकसान भरपाईची रक्कम वाढवली तरी अपीलकर्त्यांना उत्तरवादी क्रमांक २ कडून उर्वरित रक्कम किंवा अवॉर्ड मध्ये वाढवलेली रक्कम वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही. उर्वरित किंवा वाढीव नुकसान भरपाई भरण्याची जबाबदारी ही उत्तरवादी क्रमांक १ यांची राहील. असे विशेष नमूद करण्यात आले होते की, या तडजोडीचा परिणाम उत्तरवादी क्रमांक १ यांच्याकडून अपिलकर्ता यांनी उर्वरित रक्कम वसूल करण्याच्या त्यांच्या हक्कावर किंवा अवॉर्ड ची वाढीव रक्कम वसूल करण्यावर होणार नाही. हे नमूद करण्याची आवश्यकता नाही की, उत्तरवादी क्र.२ ने अपीलकर्त्यांना रु.४०,००,०००/- ची रक्कम अदा केली. परिणामी, उत्तरवादी क्रमांक २ ची जबाबदारी संपुष्टात आली आणि म्हणूनच, अपीलकर्त्यांनी उत्तरवादी क्रमांक २ विरूद्ध अपील पुढे चालवले नाही.

6. उत्तरवादी क्रमांक १ चे अभ्यासू वकील श्री. टी. एस. देशपांडे यांनी ठामपणे सांगितले की, अपीलकर्त्यांनी यापूर्वीच उत्तरवादी क्रमांक २ यांच्यासोबत तडजोड केली आहे आणि लोकअदालतीमध्ये पूर्ण आणि अंतिम तडजोड म्हणून ४०,००,०००/- रुपयांना हे प्रकरण निकाली काढले आहे आणि उत्तरवादी क्रमांक २ ने लोकअदालतीमध्ये मंजूर

केलेल्या अवॉर्ड च्या पूर्ततेसाठी रु.४०,००,०००/- ही रक्कम आधीच भरली आहे, त्यामुळे उत्तरवादी क्रमांक १ विरुद्ध नुकसान भरपाईची रक्कम वाढविण्यासाठी अपील दाखल करण्याचा अधिकार अपीलकर्त्यांना नाही. त्यांचे म्हणणे आहे की, लोकअदालत मध्ये दिलेल्या निर्णयाविरोधात कोणतेही अपील करता येणार नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी दाखल केलेले अपील अजिबात ग्राह्य धरले जाऊ शकत नाही. आपल्या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी, ते सोनबा विरुद्ध सुनील, २०१७ एससीसी ऑनलाइन बॉम ९८८९ या प्रकरणाचा संदर्भ देतात, ज्यात या न्यायालयाने परिच्छेद २० मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे:

> 20. हे पाहणे आवश्यक आहे की विद्वान दावा न्यायाधीकरणाचा अवॉर्ड एकूण रु.२,२०,५००/- च्या नुकसान भरपाईसाठी होता. वाटाघाटीनंतर अपीलकर्ता- दावेदाराने उत्तरवादीकडून वसूल करावयाच्या नुकसान भरपाईचे प्रमाण सामंजस्याने निश्चित केले. त्यांनी मान्य केले आणि रु.१,९२,५००/- रक्कम स्वीकारली व उर्वरित रु.२८,०००/- रक्कम उत्तरवादी - वाहनमालकाकडून वसूल करण्याचा अधिकार सोडला. या परिस्थितीवरून असे दिसून येते की, लोकन्यायालयात वाद मिठवणे हे फक्त भरपाईच्या रकमेच्या अंतिम ठरावाबाबत होते तर ती रक्कम कशी वसूल करायची याबाबत नव्हते. परंतु, या प्रकरणात उत्तरवादीकडून भरपाईची संपूर्ण आणि अंतिम रक्कम वसूल करण्यासाठी तडजोड करण्यात आली. त्यामुळे, एकदा का उत्तरवादी-नुकसान पोहोचवणाऱ्या वाहनाच्या मालकाकडून त्यांनी नुकसान भरपाईची रक्कम निश्चित केली की त्यांना नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ करून मागण्याबाबत कोणताही अधिकार राहत नाही. अशा विचित्र परिस्थितीत, नुकसानभरपाई वाढीसाठी अपीलकर्ता-मूळ दावेदाराची विनंती योग्य आणि विचारात घेण्यासारखी नाही. या अपिलात जर नुकसान भरपाईत कोणतीही वाढ केली गेली तर ती लोक न्यायालयात वादातील मुद्दा सामंजस्यानी आणि सोडवण्याच्या तडजोडीच्या उद्देशाला विरोध करणारे ठरेल. यामुळे लोकअदालतीमध्ये तडजोड करताना उत्तरवादीसोबत गैरवर्तन केल्याची प्रतिमा तयार होईल. त्यामुळे, कायद्याने मान्यता नसल्यामुळे, नुकसान भरपाई वाढीसाठी अपीलकर्त्याने केलेला दावा या अपिलात विचारार्थ येणार नाही. त्यामुळे, गुणविरहित म्हणून अपील फेटाळण्यात येते.

7. आपला युक्तिवाद पुढे नेत श्री. देशपांडे यांनी सादर केले की, जरी अवॉर्डनुसार दोन्ही उत्तरवादींना एकत्रितपणे एकाच मुद्द्यासाठी जबाबदार धरले असले तरी जेव्हा त्यांच्यातल्या एकाला दायितवातून मुक्त केले जाते, तेव्हा दुसऱ्याला देखील मुक्त केले जाते कारण मुद्दा एकच आहे आणि तो वेगळा केला जाऊ शकत नाही. एकत्रितपणे अपकृत्य करणाऱ्या व्यक्तींना वेगळे करून दावा चालवला गेला, त्यात एकाने पैसे अदा केल्यास दुसऱ्याची मुक्तता होऊ शकते. तथापि, अपीलकर्ते आणि उत्तरवादी क्रमांक २ यांच्यातील तडजोडीवरून असे सुचित होते की, केवळ उत्तरवादी क्रमांक २ यालाच .४०,००,०००/- भरल्यानंतर त्याच्या दायित्वातून मुक्त केले गेले आहे, परंतु, वरील कायदेशीर स्थिती लक्षात घेता, न्यायाधिकरणाने दिलेल्या अवॉर्डमध्ये लादलेल्या दायित्वातून उत्तरवादी क्रमांक २ ची केलेली मुक्तता ही देखील उत्तरवादी क्रमांक १ ला मुक्त करते आणि त्यामुळे, एकदा अपीलकर्ते उत्तरवादी क्रमांक २ सोबत तडजोड करून विशिष्ट रकमेसाठी सहमत झाल्यानंतर, उत्तरवादी क्रमांक १ विरुद्ध नुकसान भरपाई रक्कमेच्या वाढीसाठी दाखल केलेले अपील ग्राह्य धरता येत नाही. आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ ते खुशरो एस. गांधी आणि इतर विरुद्ध एन. ए. गुज्डर आणि इतर, (१९६९) १ एससीसी ३५८ या खटल्यातील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतात.

8. याउलट, अपीलकर्त्यांची बाजू मांडणारे विद्वान वकील यांनी ठामपणे सांगितले की, उत्तरवादी क्रमांक १ आणि २ यांना नुकसान भरपाई देण्यास संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार धरून त्यांच्या विरुद्ध विवादित अवॉर्ड पारित करण्यात आला आहे. त्यांच्या मते, जेव्हा एकापेक्षा जास्त व्यक्तींना संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार धरून हुकूमनामा काढला जातो, तेव्हा हुकूमनामा धारकांचा विवेकाधिकार असतो की त्यातील काही भाग एका व्यक्तीकडून वसूल करायचा की काही भाग दुसऱ्या व्यक्तीकडून वसूल करायचा किंवा कोणत्याही एका न्यायनिर्णय उत्तरवादी कडून संपूर्ण रक्कम वसूल करायची. लोकअदालतीसमोर तडजोडीद्वारे अपीलकर्ते आणि उत्तरवादी क्रमांक २ यांच्यात विशेष सहमती झाली की, या तडजोडीद्वारे केवळ उत्तरवादी क्रमांक २ ची दायित्वातून मुक्तता केली जाईल आणि अवॉर्डनुसार बाकी असलेली रक्कम तसेच उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानंतर वाढीव नुकसान भरपाई, जर कोणतीही असेल तर ती उत्तरवादी क्रमांक १ कडून वसूल केली जाईल. तडजोडीत तसे स्पष्टपणे मान्य केल्यामुळे, अपीलकर्त्यांना उत्तरवादी क्रमांक १ कडून केवळ अवॉर्ड ची उर्वरित रक्कम वसूल करण्याचा अधिकार नाही तर या अपीलात या न्यायालयाने दिलेल्या नुकसान भरपाईची वाढीव रक्कम देखील वसूल करण्याचा अधिकार आहे. त्यांनी असेही सादर केले की, तडजोडीच्या करारातच नमूद केलेल्या विशिष्ट अटींच्या पार्श्वभूमीवर, उत्तरवादी क्रमांक १ ने उद्धृत केलेला निर्णय लागू होणार नाही आणि परिणामी, उत्तरवादी क्रमांक १ विरुद्ध अपील ग्राह्य धरले जावे.

9. संबंधित पक्षांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, पहिला प्रश्न असा निर्माण होतो की, उत्तरवादी क्रमांक २ सोबत अपीलकर्त्यांनी केलेल्या तडजोडी मध्ये अटी नमूद केलेल्या असतानाही, उत्तरवादी क्रमांक १ त्याच्या दायित्वातून मुक्त होतो का.

10. हे नमूद करण्याची आवश्यकता नाही की, जेव्हा एकापेक्षा अधिक प्रतिवादीं विरुद्ध एक हुकूमनामा पारित केला जातो आणि त्यांना एकत्रितपणे आणि स्वतंत्रपणे रक्कम देण्यास जबाबदार धरले जाते, तेव्हा प्रत्येक प्रतिवादी संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे हुकूमनाम्याची संपूर्ण रक्कम देण्यास जबाबदार असतो. कोणत्याही एका किंवा दोन्ही प्रतिवादींकडून हुकूमनाम्याची रक्कम वसूल करायची ही वादीची निवड आहे. त्यामुळे, हुकूमनामा धारकाला सर्व न्यायनिर्णय सामनेवाला यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही एका विरोधात कारवाई करण्याचा अधिकार आहे, या कायद्याच्या भूमिकेवर वाद घालता येणार नाही. हुकूमनामाधारकांनी उचललेल्या अशा पावलावर प्रश्न विचारण्याचा कोणताही अधिकार न्यायनिर्णय सामनेवाला यांना नाही. तडजोडीत, जर हुकूमनामाधारकाने हुकूमनाम्याच्या रकमेतील काही भाग स्वीकारून, एखाद्या विशिष्ट न्यायनिर्णय सामनेवाला विरुद्ध हुकूमनाम्याच्या उर्वरित रकमेचा भाग वसूल करण्याचा आपला अधिकार सोडला, तरी उर्वरित रक्कम अदा करण्याच्या जबाबदारीतून इतर न्यायनिर्णय उत्तरवादींची मुक्तता होत नाही. संयुक्त अपकृत्य करणाऱ्या पैकी एकाशी तडजोड करणे याचा असा अर्थ होत नाही की वादी इतरांकडून उर्वरित रक्कम वसूल करू

शकत नाही, याचे कारण म्हणजे या तडजोडीद्वारे इतर प्रतिवादी विरुद्ध असलेला संपूर्ण दावा वाद मिटलेला नाही. एकत्र अपकृत्य करणाऱ्यांपैकी विशिष्ट अपकृत्य करणाऱ्या विरुद्ध विविध उपाय वापरणे ही हुकूमनामाधारकांच्या बाजूने एक निवड प्रक्रिया होती. त्यामुळे एकत्र अपकृत्य करणाऱ्यांपैकी एका अपकृत्य करणाऱ्याला हुकूमनाम्यातून मुक्त करणे म्हणजे इतर सर्व अपकृत्य करणाऱ्यांना मुक्त करणे असे नाही.

11. उत्तरवादीच्या अभ्यासू वकिलाने आधार घेतलेले सोनबा (सुप्रा) प्रकरण ज्यामध्ये या न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी निर्णय दिला आहे त्यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, लोकअदालतीच्या अवॉर्डनुसार एकदा का दावेदाराने नुकसानभरपाईची रक्कम पूर्ण व अंतिम तडजोडीसाठी घेण्यास सहमती दर्शविली की ती अंतिम आणि बंधनकारक असते व नुकसानभरपाईवाढीचे अपील ग्राह्य धरले जाणार नाही. तथापि, सध्याच्या प्रकरणात, पूर्ण आणि अंतिम तडजोड केवळ उत्तरवादी क्रमांक २ संदर्भात होती आणि तेथे अट होती की अवॉर्ड ची उर्वरित रक्कम उत्तरवादी क्रमांक १ कडून वसूल केली जावी. त्यामुळे सोनबा (सुप्रा) मधील निर्णय लागू होणार नाही.

12. खुशरो (सुप्रा) या प्रकरणात, वादींनी सहा प्रतिवादींविरुद्ध नुकसानभरपाईसाठी दावा दाखल केला होता आणि ते संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार असल्याचा आरोप केला होता. सहाव्या प्रतिवादीने माफी मागितली जी वादींनी स्वीकारली आणि

सहाव्या प्रतिवादीशी तडजोडी नुसार हुकूमनामा देण्यात आला. सहाव्या प्रतिवादी सोबत केलेली तडजोड उर्वरित प्रतिवादींवर दावा चालविण्यासाठी अडथळा म्हणून काम करणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायनिर्णयाचा संबंधित भाग खालीलप्रमाणे पुनरुत्पादित करण्यात आला आहे:

> 17. तथापि, आम्हाला असे वाटते की, ब्राऊन विरुद्ध मुटॉन, ८० एचआर ४७ पूर्वी असलेला सामान्य कायद्याचा नियम आणि अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारलेला नियम समता, न्याय आणि सद्सद्विवेकबुद्धीशी अधिक सुसंगत आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, वादीने एका अपकृत्य करणाऱ्याकडून पूर्ण समाधान प्राप्त केले पाहिजे, किंवा कायद्याने ते पूर्ण समाधान मानले पाहिजे, त्यापूर्वी इतर एकत्रित अपकृत्य करणाऱ्यांना सामंजस्य आणि समाधानावर अवलंबून राहता येणार नाही. हा नियम अपकृत्य करणाऱ्यांची जबाबदारी संयुक्त आणि स्वतंत्र असल्याचे मान्य करतो.
>
> पूर्ण समाधान काय आहे हे प्रकरणातील तथ्य आणि परिस्थितीवर अवलंबून असेल. उदाहरणार्थ, रामकुमार सिंग विरुद्ध अली हुसेन, आयएलआर (१९०९) ३१ ऑल ७५९ या खटल्यात २५ रुपये स्वीकारणे हे पूर्ण समाधान नव्हते.
>
> 18. या प्रकरणात प्रतिवादी रबाडीकडून माफी मागितली गेली आणि ती स्वीकारली गेली आणि एका हुकूमनाम्यामध्ये अंतर्भूत केली गेली. हे अन्य अपीलकर्ते प्रतिवादींनी केलेल्या आरोपांबद्दल पूर्ण समाधान मानले जाऊ शकत नाही. परंतु हे वादींचे राबडी विरोधात आपली कार्यवाही सुरू ठेवण्याचा निवडीचा एक भाग मानले पाहिजे. परंतु याकडे प्रतिवादी रबाडी विरोधात अनेक उपाय योजना करण्यासाठी वादीची ही निवड म्हणून पाहिले पाहिजे.

13. सध्याच्या खटल्याला हे प्रमाण लागू केल्यास, असे लक्षात येते की तडजोडीत स्पष्टपणे नमूद केले आहे की, या तडजोडीत उत्तरवादी क्रमांक २ - अपघातास कारणीभूत असलेल्या वाहनाचा चालक जो अपघातात सहभागी आहे, त्याला दायित्वातून मुक्त केले आहे, आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर याचिकाकर्ते

अवॉर्डची उर्वरित रक्कम तसेच कोणतीही नुकसानभरपाईची वाढीव रक्कम उत्तरवादी क्रमांक १ - अपघातात कारणीभूत असलेल्या वाहनाचा मालक यांचे कडून वसूल करण्यास मोकळे असतील. उत्तरवादी क्र.२ बरोबरच्या तडजोडीला वर नमूद केलेल्या खटल्यात नमूद केल्याप्रमाणे हुकुमनाम्याची संपूर्ण आणि अंतिम तडजोड म्हणता येणार नाही कारण याचिकाकर्त्याने एकूण ५०,७४,८२१/- रकमेपैकी ४०,००,०००/- रुपयांच्या स्वरूपात अवॉर्ड ची अंशतः रक्कम स्वीकारली. त्या विशिष्ट परिस्थितीमध्ये, विशेषतः तडजोडीच्या अटी या विरुद्ध असताना, उत्तरवादी क्रमांक २ सोबत केलेल्या तडजोडीनुसार त्यांना मिळालेल्या फायद्याप्रमाणे समान फायदे मिळावेत म्हणून उत्तरवादी क्रमांक १ दावा करू शकत नाही. त्यामुळे खुशरो (सुप्रा) चे प्रकरणही उत्तरवादी क्रमांक १ ला उपयोगी पडणार नाही तर त्याऐवजी, ते अपीलकर्त्यांच्या युक्तिवादांचे समर्थन करते.

14. वरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर उत्तरवादी क्रमांक १ ने उपस्थित केलेल्या आक्षेपात मला तथ्य आढळत नाही, त्यामुळे हे अक्षेप फेटाळले जातात.

15. आता मी गुणवत्तेच्या आधारे अपिलाचा विचार करत आहे. या अपिलामध्ये मुख्य युक्तिवाद असा आहे की, मृतव्यक्तीच्या मृत्यूनंतर दाखल करण्यात आलेल्या निशाणी-८३ वरील सन २०१५-१६ च्या प्राप्तिकर विवरणपत्रात नमूद केलेल्या उत्पन्नाचा विचार न

करून न्यायाधिकरणाने चूक केली आणि या चुकीमुळे मृताच्या उत्पन्नाचे चुकीचे मूल्यमापन झाले आणि परिणामी न्यायाधिकरणाने अयोग्य अवॉर्ड दिला.

16. विवादित अवॉर्ड चे अवलोकन केल्यास असे आढळून येते की, न्यायाधिकरणाने आपल्या न्यायनिर्णयाच्या परिच्छेद २८ मध्ये मृतव्यक्तीचे उत्पन्न २०१३-१४ या वर्षासाठी रु.२,०३,३००/- आणि २०१४-१५ या वर्षासाठी रु.२,२७,६०० मानले आहे. मात्र, प्राप्तिकर विवरणपत्रात नमूद केलेल्या २०१५-१६ या वर्षाचे मृतव्यक्तीचे उत्पन्न म्हणजे रु.४,३२,०००/- हे विश्वासार्ह दस्तऐवज नसल्याचे कारण देत न्यायाधीकारणाने मान्य केले नाही. न्यायाधिकरणाने मागील वर्षातील उत्पन्नातील वाढ विचारात घेऊन सन २०१५-१६ मधील मृतांच्या उत्पन्नाचे मूल्यमापन केले व अंदाजाच्या आधारे २०१४-१५ या वर्षासाठी उत्पन्नात रु.२४,३००/- इतकी रक्कम जोडली.

17. अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद असा आहे की, केवळ २०१५-१६ या वर्षाचे आयकर विवरणपत्र मयतव्यक्तीच्या मृत्यूनंतर भरले गेले होते, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आपल्या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी ते <u>मीना पवईया आणि इतर विरुद्ध अशरफ अली आणि इतर, (२०२१) १७ एससीसी १४८ या प्रकरणाचा संदर्भ देतात.</u> ज्यामध्ये मयताच्या उत्पन्नाचे मूल्यांकन करताना मयताच्या मृत्यूनंतर भरलेल्या आयकर विवरणपत्राचा विचार केला गेला. अपीलकर्त्यांनी <u>मलारविझी आणि इतर विरुद्ध</u>

युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि इतर (२०२०) ४ एससीसी २२८ या प्रकरणाचा देखील संदर्भ दिला.

18. याउलट, उत्तरवादींच्या अभ्यासू वकिलांनी व्ही. सुब्बुलक्ष्मी आणि इतर विरुद्ध एस. लक्ष्मी आणि इतर (२००८)४ एसएससी २२४ या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला आहे. ज्यामध्ये मयताच्या मृत्यूनंतर भरलेल्या आयकर विवरणपत्राचा विचार केला गेला नाही.

19. मी दोन्ही पक्षांनी संदर्भित केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आढावा घेतला आहे. मीना पवईया (सुप्रा) आणि मलारविझी (सुप्रा) या प्रकरणांमध्ये मरणानंतर सादर केलेला आयकर परतावा विचारात घेतला गेला, तर व्ही. सुब्बुलक्ष्मी (सुप्रा) या प्रकरणात मरणानंतर सादर केलेला आयकर परतावा विचारात घेतला गेला नाही. मात्र, यापैकी एकाही प्रकरणांमध्ये असे प्रमाण सुचवले गेलेले नाही की मयताच्या मृत्यूनंतर सादर केलेले आयकर विवरण न्यायालयाने विचारात घेतलेच पाहिजे. त्यामुळे करदात्याच्या मृत्यूनंतर प्राप्तिकर प्राधिकरणाकडे सादर केलेल्या प्राप्तिकर विवरणपत्रात दर्शविलेल्या उत्पन्नाचा विचार प्रत्येक प्रकरणातील तथ्य आणि परिस्थितीवर अवलंबून असेल. न्यायाधीकरणाने संबंधित परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे.

20. सध्याच्या प्रकरणात अपीलकर्त्यांनी २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांचे मयतव्यक्तीचे आयकर विवरणपत्र सादर केले आहे. सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षांतील उत्पन्नातील तफावत रु.२४,३००/- होती. सन २०१४-१५ मध्ये या रक्कमेने मयताच्या उत्पन्नात वाढ झाली होती. तथापि, मयतव्यक्तीच्या मृत्यूनंतर तसेच याचिका दाखल केल्यानंतर सादर करण्यात आलेल्या सन २०१५-१६ च्या प्राप्तिकर विवरणपत्रातील उत्पन्नामध्ये मोठी वाढ दर्शविण्यात आली आहे. २०१४-१५ मध्ये २,२७,६००/-रुपये उत्पन्न होते, जे २०१५-१६ मध्ये ४,३४,०००/-रुपये झाले आहे, म्हणजेच ते २०१४-१५ च्या उत्पन्नाच्या जवळपास दुप्पट आहे. तेही तेव्हा जेव्हा अपघाताच्या तारखेपासून म्हणजेच २०.०२.२०१५ पासून ते मृत्यू होईपर्यंत मयत व्यक्ती अंथरुणाला खिळलेली आणि बेशुद्ध अवस्थेत असताना, आणि त्यानंतरही मयत व्यक्तीच्या उत्पन्नात विशेषत: सन २०१५-१६ च्या त्या दहा महिन्यांत झालेल्या प्रचंड वाढीसंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे, २०१५-१६ च्या प्राप्तिकर विवरणपत्रात दर्शविलेले मयताचे उत्पन्न फेटाळताना न्यायाधीकरणाने नोंदवलेल्या निष्कर्षात मला कोणतीही त्रुटी आढळत नाही. त्यामुळे न्यायाधिकरणाच्या निष्कर्षात कोणत्याही हस्तक्षेपाची गरज नाही. अवलंबितांच्या नुकसानीचे मूल्यमापन न्यायाधिकरणाने उत्तम न्यायनिर्णयांवर आधारित राहून केले आहे; म्हणून,

अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलांच्या सादरीकरणात मला गुणवत्ता आढळत नाही आणि ते फेटाळले जाण्यास पात्र आहे. त्यानुसार, अपील फेटाळले जाते.

(न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवाणी)

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x